आर.सी.सी.क्रं.६७१/२०१९
नि. क्रमांक.३८.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०६ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की :-

माझे नाव :- विद्या अशोक लवंगर,
वय सुमारे :- ३५ वर्षे, व्यवसाय :- मजुरी,
निवासस्थान :- चांदखेड, ता.मावळ, जि. पुणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. एस. पवार यांच्यामार्फत**

मी मौजे चांदखेड येथे राहते. मी मोल मजुरीचे काम करते. सन २०१९ मध्ये मी अरुणा माळी यांच्या शेतामध्ये भुईमूग खुरपण्यासाठी मजुरीने गेले होते. माझ्यासोबत खुरपणीसाठी कविता साळवे, लक्ष्मी वैराळे व अरुणा माळी हया महिला हजर होत्या. मी आरोपींना ओळखते. आम्ही खुरपणी करत असतांना आरोपींची गुरे भुईमुगाच्या शेतामध्ये आली होती व भुईमुग खात होती. गुरे भुईमुग खात असल्यामुळे अरुणा माळी व आरोपींमध्ये भांडण झाले होते. भांडण चालू होते त्यावेळी मी लांब अंतरावर ऊभे होते. भांडणामध्ये कोणी कोणाला शिवीगाळ केली होती हे मला माहित नाही. आरोपींनी शिवीगाळ केली होती असे घडले होते. आरोपींनी काय शिवीगाळी केली हे मला माहित नाही.

**साक्षीदार सहकार्य करत नसल्याने भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे सरकारी विधीज्ञ यांना साक्षीदारास सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.**

०२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींची गुरे भुईमुगाच्या शेतात आल्यावर अरुणा माळी आरोपी श्रीकांत यास म्हणाली की, तुझी गुरे बाजुला लांब घेऊन जा, आम्ही कष्टाने पिक काढले आहे, जनावरे पिक खात आहेत. आरोपी श्रीकांत याने त्याच्या हातातील गज अरुणा माळी हिस दाखवून गज हा गांडीत घालून फिरवेल असे म्हणल्याचे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपींना अरुणा माळी वयस्कर आहे, शिवीगाळी करु नको, ती तुझ्या आजीसारखी आहे असे म्हणाले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी श्रीकांत मला म्हणाला होता की, तुम्हाला काय करायचे आहे, तुम्ही तुमचे काम करा. हे म्हणणे खरे नाही की, श्रीकांत याने अरुणा माळी हिचा हात धरुन ओढला.

०३. हे म्हणणे खरे आहे की, भांडणानंतर आरोपी तेथून निघून गेला व अरुणा माळी देखील घरी निघून गेली. हे म्हणणे खरे आहे की, अरुणा माळी हिने घडलेली घटना तिच्या मुलांना सांगितली असता मुलांनी आरोपीस जाब विचारला असता आरोपींनी अरुणा माळी हिच्या मुलांना मारहाण केल्याचे मला समजले होते. घटनेच्या दुस-या दिवशी पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता.

आरोपी श्रीकांत याने त्याच्या हातातील गज अरुणा माळी हिस दाखवून गज हा गांडीत घालून फिरवेल असा मजकूर पोलीसांनी माझ्या जबाबात का नमुद केला हे मी सांगू शकत नाही. माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग ब पोलीसांनी माझ्या जबाबात का नमुद केला याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी गावातील रहीवाशी असल्यामुळे माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आज न्यायालयात हजर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना वाचवण्यासाठी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विदवान वकिल श्री. रौंधळ यांच्यातर्फे शपथेवर सुरु.**

०४. हे म्हणणे खरे नाही की, मी माळी यांच्या विट भट्टीवर विटा थापण्याचे काम करते. मी चांदखेड येथे पंधरा वर्षांपासून राहते. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती माळी यांच्या जे सी बी वाहनावर चालक म्हणून काम करतात. विट भट्टीची जागा हि सुधीर बारमुख यांची आहे. घटना हि दि. १९ ऑगस्ट २०१९ रोजी घडली होती. पोलीसांनी माझा जबाब कोणत्या तारखेला नोंदवला हे मला सांगता येणार नाही. पोलीसांनी माझा जबाब घटनास्थळी घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, रामकृष्ण माळी हे माझा जबाब नोंदवते वेळी माझ्यासोबत हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, रामकृष्ण माळी हे आजरोजी न्यायालयात आलेले आहेत.

०५. आरोपींची पाच सहा जनावरे शेतात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, भांडण सुरु होते त्यावेळी मी ब-याच अंतरावर ऊभी होते. हे म्हणणे खरे आहे की, भांडणानंतर माझ्यासोबत असलेल्या महिलांनी मला काय भांडण झाले ते सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे गावातील रहीवाशी असल्यामुळे मी त्यांना सुरुवातीपासून ओळखते. आरोपींचे शेत माळी यांच्या शेतापासून किती दुर आहे हे मी सांगू शकत नाही. घटनेच्या दिवशी शेतामध्ये जगताप नावाची महिला माझ्यासोबत मजुरीस होती. हे म्हणने खरे नाही की, माळी व माझे चांगले संबंध असल्यामुळे मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/xxx

**दिनांक. २१/०७/२०२६**

**(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**
**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**वडगाव, ता.मावळ, जि. पुणे.**